Azari sir 102

IMPACT FACTOR 4.75

ISSN 2250-169X

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

# VISION RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XV, Vol. - I**

Year-VIII, Bi-Annual(Half Yearly)

(June 2018 To Nov. 2018)

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

Dr. E. Sivanagi Reddy
'Sthapathi'
Dept. of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris (France)

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Barlin,
Barlin (Jermany)

Dr. Raja Reddy
Formar, Director, N.I.M.S.
Hyderabad (A.P.)&
World Famous Neurosurgeon

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad (A.P.)

Dr. Arjun Jadhav
Dept. of Egnlish,
Furgusion College,
Pune, Dist. Pune

Dr. Sarjerao Shinde
Principal,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S)

**DEPUTY EDITORS**

Dr. Ashok G. Chaskar
Head, Dept. of Egnlish,
S.P. College, Pune &
Dean, Faculty of Arts & Fine Arts, University of Pune, Dist. Pune.

Dr. M. Veeraprasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

Prof. Shrikant A. Jewale
Dept. of Geography,
Gramin Mahavidyalaya,
Vasantnagar, Dist. Nanded (MS)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. Dr. Mahadeo S. Kamble
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Prashant B. Kshirasagar
Dept. of Marathi,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**CO - EDITORS**

Dr. Allabaksha Jamadar
Chairman, BOS, Hindi, SRTMUN &
Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Sharadchandra Arts, Com., & Sci. College,
Naigaon (Bz), Dist. Nanded. (M.S.)

Dr. Shivaji Vaidhya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani, Dist. Parbhani (M.S.)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

**Price : ₹ 200/-**

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Study of HR Management Practices in Co-Operative and Private Sugar Industries In Maharashtra<br>**Dr. Madhav Palmate** | 1 |
| 2 | The Theme of Indianness in Jejuri by Arun Kolatkar<br>**Dr. R.E. Solunke** | 9 |
| 3 | Manjukapur's feminist stance in the portrayal of Man-Woman Relationship in Her Novels<br>**Geeta V. Waghmare** | 16 |
| 4 | Standardization of Service Skill test for Memale Volleyball Players<br>**Dr. Suresh Mahadeo Landge** | 20 |
| 5 | Cultural Life of Pardhi Community in Maharashtra<br>**Dr. Jivan Gangane** | 26 |
| 6 | महाराष्ट्रातील शेतमाल विपणन आणि रास्त भाव<br>**डॉ. शिवराज रामराव पाटील** | 32 |
| 7 | महाराष्ट्रातील पाणी टंचाई आणि राजकारणाचा अर्थशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. बालाजी ग्यानोबा कांबळे** | 44 |
| 8 | महाराष्ट्र राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेतील सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या स्फोटक क्षमतेचा अभ्यास<br>**डॉ. रमेश विश्वनाथ आजरी** | 50 |
| 9 | महिला सक्षमीकरण आणि शासन एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. एस. पी. घायाळ** | 55 |

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 50

8

# महाराष्ट्र राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेतील सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या स्फोटक क्षमतेचा अभ्यास

डॉ. रमेश विश्वनाथ आजरी
शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख,
भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
बार्शी, जि. सोलापूर

## Research Paper - Physical Education

नियोजित शारीरिक व्यायाम केल्यामुळे व्यक्ती शारीरिक दृष्ट्या तंदुरूस्त राहू शकते. परंतु क्रीडा क्षेत्रात उच्च पातळीवर यश संपादन करण्यासाठी, प्राविण्य मिळविण्यासाठी खेळाडूस त्याच्या ठराविक विशिष्ट खेळानुसार, खेळातील जागेनुसार शारीरिक गुणवत्ता आणि कौशल्य कार्यमान वाढविण्यासाठी शास्त्रीय प्रशिक्षण पद्धतीचा अवलंब करावा लागते.

निरोगी व आरोग्यसंपन्न व्यक्तिच जीवनाचा आनंद व उपभोग घेऊ शकते. शारीरिक क्षमतेवर शरीर स्वास्थ अवलंबून असते तसेच मानसिक तणावाचाही शारीरिक सुदृढतेवर प्रभाव पडतो, योग्य व्यायाम प्रकारची आपली शारीरिक सुदृढता विकसित केली जाऊ शकते. त्याचबरोबर शरीराचे आरोग्यही चांगले राखता येते. व्यायाम मानवी जीवनाचा एक आवश्यक घटक आहे. त्यांच्या माध्यमातून मनुष्य शारीरिक सुदृढता प्राप्त करू शकतो. शारीरिक सुदृढता व आरोग्य चांगले राहण्याकरिता व्यायामाची नितांत गरज आहे.

The ability to carry out daily task with vigar and alterness without undue fatigue and which ample energy to enjoy leisur time, pursuit and to meet unforcesech emergencies.

शारीरिक सुदृढतेची व्याख्या करताना एडवर्ड बार्टनने असे म्हटले आहे की, "शरीराचा विभिन्न संख्याद्वारा योग्य संतोषजनक कार्य करण्याची शक्ती म्हणजे शारीकि सुदृढता."

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 51

नियमित व्यायामाने स्वास्थ विकसित होते. आपल्या वर्तमान युगात नवीन पद्धतीत नकारात्मक दृष्टीकोन, ताण व आळस यामुळे आपल्या कामात शिथीलता येते. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने नियंत्रित व्यायाम करून आपली शारीरिक सुदृढता राखली पाहिजे. व्यायामुळे शारीरिक क्षमता वाढण्यास मदत होते. शारीरिक सुदृढता ही व्यक्तिगत असून ती शरीराच्या विभिन्न संख्याद्वारा प्रदर्शित केली जाते. त्यात मासपेशींचा सहभाग असतो.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाला महाराष्ट्र राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या पायाची स्फोटक क्षमतेचा अभ्यास हे प्रमुख उद्दिष्ट ठरविले आहे.

"संशोधन विषयाशी संबंधित व्यक्तीच्या घटकांच्या समूहाला जनसंख्या असे म्हणतात." महाराष्ट्र राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये दरवर्षी १९ वर्षे वयोगटात सरासरी २३ संघ सहभागी होतात. अशाप्रकारे महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटना आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत सरासरी २७६ खेळाडू प्रतिवर्षी सहभागी होतात. याप्रमाणे शालेय राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ८ विभागातील प्रत्येकी १ प्रमाणे प्रतीवर्षी ८ याप्रमाणे ९६ खेळाडू सहभागी होतात. असे प्रतीवर्षी एकूण ३७२ खेळाडू सहभागी होतात. असे मागील ३ वर्षातील एकूण खेळाडू १११६ खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यातील १११६ ही एकूण जनसंख्या संबोधण्यात आली. यापैकी सुगम यादृच्छिक पद्धतीने ५०० खेळाडूंची निवड करण्यात आली. व ही संशोधनाची जनसंख्या N=५०० घेण्यात आली. पायाची स्फोटक क्षमता मोजण्यासाठी व्हर्टीकल जम्प ही चाचणी माहिती संकलनासाठी उपयोगात आणली.

**व्हर्टीकल जम्प :**

उद्देश- पायाची स्फोटक क्षमता तपासणे. साहित्य- सेंटीमीटर मध्ये खुणा केलेली सपाट भिंत, मार्कींग टेप, सपाटपृष्ठ भाग, सहाय्यक, नोंदपत्रके


वर्णन- आखलेल्या भिंतीला लागूनच प्रत्येक खेळाडूला दोन्ही पायांवर उभे राहण्यास सांगितले कोणत्याही एका बाजूने भिंतीच्या विरूध्द दिशेने खेळाडूला उभे राहण्यास सांगितले. भिंतीच्या बाजूने जो हात असेल त्या हाताने खडूची पावडर लावून खुण करण्यास सांगितले पाया- टाचा उचलण्यास मनाई केली. त्यानंतर गुडघ्यातून वाकून जास्तीत जास्त उडी घेण्यास सांगितली. उडी घेताना भिंतीवर खुणा आणि उडी घेतल्यानंतर केलेली खूण यामधील अंतराचे मापन केले. प्रत्येक खेळाडूंना तीन वेळेस उडी घेण्याची संधी देण्यात आली. गुण - खेळाडूंना देण्यात आलेल्या तीन संधीमधून उत्तम अंतराची सेंटीमीटरमध्ये नोंद केली.

महाराष्ट्र राज्यस्तरीय पुरूष व्हॉलीबॉल खेळाडूंची व्हर्टिकल जम्प चाचणी

तक्ता क्र.१ : पुरूष व्हॉलीबॉल खेळाडूंची व्हर्टिकल जम्प चाचणीचे मापन विश्लेषणासाठी आवश्यक सांख्यिकी.

| अ.क्र. | सांख्यिकीय परिमाणे | प्राप्तांकाची विभागणी |
|---|---|---|
| ०१. | मध्यमान | ४३.६३ |
| ०२. | मध्यांक | ४३ |
| ०३. | बहुलक | ४१.७५ |
| ०४. | प्रमाण विचलन | २.३ |
| ०५. | चतुर्थक विचलन | ४.५ |
| ०६. | विचलन सहगुणक | ९.७६३ |
| ०७. | किमान | ३९ |
| ०८. | कमाल | ५९ |
| ०९. | विषमितता | ०.८१४७ |
| १०. | विषमितता त्रुटी | ०.१५२ |
| ११. | शिखर दोष | ०.७५ |
| १२. | शिखर दोष त्रुटी | ०.३०५५ |

आलेख क्र. १ : पुरूष व्हॉलीबॉल खेळाडूंची व्हर्टिकल जम्प चाचणी दर्शविणारा आलेख




आलेख क्र. १ तक्ता क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, सर्व २५७ पुरूष व्हॉलीबॉल खेळाडूंची व्हर्टिकल जम्प चाचणीची नोंद केल्यानंतर व्हर्टिकल जम्पची सरासरी उंची ४३.६३ से.मी.

आहे. मध्यांक आणि बहुलकचे मूल्य सुध्दा अनुक्रमे ४३ से.मी. आणि ४१.७५ से.मी. आहे. मध्यमान (४३.६३) हे संपूर्ण नमुन्याचे (२५७) प्रतिनिधित्व करीत आहे. मध्यमानपेक्षा मध्यांक आणि बहुलकाचे मूल्य कमी असल्यामुळे पुरुष व्हॉलीबॉल खेळाडूंच्या व्हर्टिकल जम्प चाचणी प्राप्तांकांचा वक्र हा धन विषमियतता आहे. विषमितता Sk=(०.८१४) हा धन विषमित आहे. प्रमाण विचलन २.३ एवढे आहे. विषमियतता त्रुटी (६Sk) ०.१५२ असून, नमुन्याच्या मध्यमानाची त्रुटी ०.१४३ एवढी आहे. विषयनियतता त्रुटी ही (६Sk=१.५२, P>०.०५) म्हणजेच विषमितता मूल्याचे विचलन आणि संकलित माहितीचे वितरण हे समरूपी वितरण आहे. विचलन सहगुणक १.७६३ एवढा आहे प्राप्तांक वक्राच्या डावीकडे एकवटलेले आहे.

तक्ता क्र. १ पुरुष व्हॉलीबॉल खेळाडूंच्या व्हर्टिकल जम्प चाचणी प्राप्तांकांच्या वितरणातील शिखर दोष (०.७५०>०.२६३) असा आहे. शिखर दोष ०.७५ एवढा असून, ०.२६३ पेक्षा जास्त असल्यामुळे वक्र हा चिपिट शिखरी वक्र आहे. शिखर दोष लक्षणीय आहे हे ठरविण्यासाठी शिखर दोष त्रुटी (६ku=०.३०५५ P >०.०५) काढण्यात आलेली आहे. जनसंख्येच्या घटकानुसार विभागणी ही बहूजिनसी आहे. बहूजिनसी गट हा प्रसामान्य वक्र दर्शवित आहे. म्हणून प्राप्तांकांचे वितरण हे प्रसामान्य वक्राचे निदर्शक आहे.

वरील माहिती वरून असे सिद्ध होते की, पुरुष खेळाडूंच्या व्हॅर्टिकल जम्पचा विचार केल्यास ऋण विषमितता आणि चिपिट शिखरी वक्र याप्रमाणे वितरण दर्शवित असले तरी व्हॅर्टिकल जम्प साधारणपणे सर्वसामान्य सारखीच आहे. बहूजिनशी गुणधर्म हे सुध्दा सर्व सामान्य आहे.
या वरून निष्कर्ष सिद्ध होतो की, पुरुष व्हॉलीबॉल खेळाडूंची प्राप्तांकांचे विचलन सामान्य आहे. म्हणून आदर्श पुरुष व्हॉलीबॉल संघ तयार करण्यासाठी हा खेळाडूंची व्हर्टिकल जम्प क्षमता हा निकष शोधणे अत्यंत आवश्यक आहे.

**तक्ता क्र. २ : पुरुष व्हॉलीबॉल खेळाडूची व्हर्टिकल जम्प चाचणीची वारंवारिता**

| अ.क्र. | खेळाडूंची उंची | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१. | ३७-४१ | १९ | ७.३९% |
| ०२. | ४२-४६ | ११४ | ४४.३६% |
| ०३. | ४७-५१ | ७२ | २८.०२% |
| ०४. | ५२-५६ | ३१ | १२.०६% |
| ०५. | ५७-६१ | २१ | ८.१७% |

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 4.75
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 54

तक्ता क्र. ३ वरून निदर्शनास येते की, बहुसंख्य ११४ पुरूष व्हॉलीबॉल खेळाडूची व्हर्टिकल जम्प चाचणीत उंची ४२ ते ४६ से.मी. दरम्यान प्राप्तांक मिळालेले आहे. १९ या पुरूष खेळाडूची व्हर्टिकल जम्पची कमीत कमी उंची ३७ ते ४१ से.मी. दरम्यान प्राप्तांक मिळलेले आहे, तसेच २१ पुरूष खेळाडूची व्हॅर्टिकल जम्पची जास्तीत जास्त उंची ही ५७ ते ६१ से.मी. च्या दरम्यान प्राप्तांक आहेत.

**निष्कर्ष :**

१. संकलित माहिती वरून असे सिद्ध होते की, पुरूष खेळाडूंच्या व्हॅर्टिकल जम्पचा विचार केल्यास ऋण विषमितता आणि चिपिट शिखरी वक्र याप्रमाणे वितरण दर्शवित असले तरी व्हॅर्टिकल जम्प साधारणपणे सर्वसामान्य सारखीच आहे. बहूजिनशी गुणधर्म हे सुध्दा सर्व सामान्य आहे.

२. पुरूष व्हॉलीबॉल खेळाडूंची व्हॅर्टिकल जम्प प्राप्ताकांचे विचलन सामान्य आहे. म्हणून आदर्श पुरूष व्हॉलीबॉल संघ तयार करण्यासाठी हा खेळाडूंची व्हर्टिकल जम्प क्षमता हा निकष शोधणे अत्यंत आवश्यक आहे.

**शिफारशी :**

संघ निवडीसाठी स्फोटक क्षमता चाचणी उपयोगात आणावी. स्फोटक क्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण राबविण्यात यावेत. राज्यस्तरीय खेळाडूंचा स्फोटक क्षमता स्तर हा सर्वसाधारण आहे. हा उंचविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## संदर्भ सूची :-

१) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, पुणे, २०००, पृ.क्र. १७०

२) भितांडे, वि. रा., शैक्षणिक संशोधन पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे, १९८९, पृ.क्र. ४५

३) फिरोदिया अरूण, (२०१२, १३ जाने.), मराठी माणूस, मराठी भाषा आणि मराठी माता, दै. मराठी पुण्यनगर, औरंगाबाद, पृ.क्र. ६

४) Best, J.W. Research in Education, Prentice Hall of India Pvt.Ltd., New Delhi, ४th Edition, १९८२, P. ८९-९०